# KIRAN TUTORIALS

Seat No. 

**Std 10 (English)** **Marathi** **Date 01-10-20**

| Time 1HRS | Chapter 2.00,21,22,23,4.00,7.00,9 | Marks 25 |
|---|---|---|


**Q.1** **पुढील उतारा वाचून दिलेल्या सूचनांनुसार कृती करा :** **7**

**1** **A1)** i) एका वाक्यात उत्तर लिहा 1


लेखकाचा कोणता विचार पोकळ होता?

**Ans** नुसती उकडलेली पालेभाजी खाणे कसे जमणार हा विचार पोकळ होता.

ii) आकृती पूर्ण करा 1




**Ans**




साखरेत सर्वात अधिक कॅलरीज असतात, म्हणून प्रथम बिनसाखरेचा चहा सुरू केला. पहिल्या दिवशी विशेष फरकही वाटला नाही. घरात साखरबंदी जाहीर केली. कुटुंबाला सारी दिवाळी तिखटामिठावर उरकायची सक्त ताकीद दिली. "मुलांसाठी म्हणून काय थोडं गोडाधोडाचं करायचं ते कर." एवढी सवलत ठेवली. पहिल्या दिवशीच मला फरक जाणवायला लागला. भात अजिबात वर्ज्य करणे अवघड होते, म्हणून फक्त पहिला भात आणि ताकभात ठेवून मधला भात वर्ज्य केला. नुसती उकडलेली पालेभाजी खाणे कसे जमणार हा विचार किती पोकळ होता, याचा अनुभव ती खाल्ल्या वर आला आणि नेहमीच्या भाजीत 'ही' निराळे काय करते याचा अजूनही अंदाज आला नाही.

पहिला दिवस सुरळीत गेला आणि दुसऱ्या दिवशी व्रतभंगाचा प्रसंग आला. पहिल्या दिवशी निम्म्या हून अधिक कचेरीला माझ्या वजन घटवण्याच्या व्रताची वार्ता गेली होती; परंतु दुसऱ्या दिवशी आमच्या अण्णा नाडगौडाला प्रमोशन मिळाल्या ची वार्ता आली आणि त्याने साऱ्या सेक्शनला पार्टी दिली. कँटीनच्या आचाऱ्या ने तर माझ्या 'डायट' वर सूड घ्यायचा असे ठरवून पदार्थ केले होते. बरे, न खावे तर अण्णा नाडगौडाला वाईट वाटणार! बिचारा सहा वर्षांनी 'एफिशिएन्सीबार'च्या जाळ्यातून बाहेर पडला होता. आचाऱ्याने मिठाईत साखर न घालता साखरेत मिठाई घालून आणली होती. घासाघासागणिक सहस्रावधी कॅलरीज पोटात चालल्या होत्या, त्यामुळे खाल्लेले गोड लागत नव्हते. बटाटेवडे होते- म्हणजे आणखी कॅलरीज. चिवडा अस्सल 'वनस्पती'तला, त्यामुळे आणखी कॅलरीज आणि एवढे सगळे हादडून शेवटी 'भज्यांशिवाय पार्टी कसली?' या भिकोबा मुसळ्याच्या टोमण्यामुळे चेकाळून नाडगौडाने स्पेशल भज्यांची परत ऑर्डर दिली.

**Ans**

**A2)** कोण ते लिहा. 2

1)

i. लेखकाच्या 'डायट' वर सूड घेणारा - ______

ii. सारी दिवाळी तिखटामिठावर उरकायची अशी यांना ताकीद मिळाली - ______

**Ans**

i. लेखकाच्या 'डायट' वर सूड घेणारा - **कॅंटीनचा आचारी.**

ii. सारी दिवाळी तिखटामिठावर उरकायची अशी यांना ताकीद मिळाली - **कुटुंबाला.**

2)
i. भज्यांशिवाय पार्टी कसली टोमणा मारणारे - ______
ii. कचेरीतील सा-या सेक्शनला पार्टी देणारे - ______

**Ans**
i. भज्यांशिवाय पार्टी कसली टोमणा मारणारे - **भिकोबा मुसळे.**
ii. कचेरीतील सा-या सेक्शनला पार्टी देणारे - **अण्णा नाडगौडा.**

**A3)** स्वमत 3

पार्टीत जास्त खाल्ल्यामुळे त्रास झालेल्या मित्राला तुम्ही कसे समजवाल ?

**Ans** एकदा सोसायटीच्या स्नेह संमेलनाला पार्टी होती खाण्या पिण्याची रेलचेल होती. त्यात भारतीय चायनीज, इटालियन इत्यादी खाद्य पदार्थ होते. आइसक्रीमचे विविध प्रकार होते. त्यामध्ये माझ्या एका मित्राने चायनीज पदार्थांवर अगदी ताव मारला. त्याने सूप, राईस, तसेच गोडधोड खाल्ले. मग आइसक्रीम खाल्ली. पण दुस-या दिवशी त्याला जुलाब व उलट्या होऊ लागल्या. पोट बिघडले त्यानंतर डॉक्टरकडे नेले. मी त्याला संतुलित व पोष्टिक आहाराबद्दल समजावले आपल्या शरीरासाठी लागेल तेवढेच खावे तरच पचन होईल.

**Q.2** **पुढील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनांनुसार कृती करा.** **8**

1 **A1)** i) योग्य पर्याय निवडा 1

कवितेतील ‘दीनदुबळे’ म्हणजे ..............
i. कष्टाचे, पैसे नसलेले
ii. शारिरिकदृष्ट्या सक्षम नसलेले
iii. सैनिकबरोबर लढणारे
iv. सैनिकांच्या कार्याचा अभिमान बाळगणारे देशवासीय

**Ans** कवितेतील ‘दीनदुबळे’ म्हणजे **सैनिकांच्या कार्याचा अभिमान बाळगणारे देशवासीय.**

ii) एका वाक्यात उत्तर लिहा 1

जवानांचे रक्षण कसे होणार आहे?

**Ans** जवानांचे रक्षण असंख्य ज्योतींनी होणार आहे.

| | |
|---|---|
| नाही मुठी मध्ये द्रव्य | धडाडत्या तोफांतून |
| नाही शिरेमध्ये रक्त, | तुझे पाऊल जिद्दीचे; |
| | |
| काय करावें कळेना | तुझी विजयाची दौड |
| नाही कष्टाचे सामर्थ्य; | डोळे भरून पहावी; |
| | |
| जीव ओवाळावा तरी | डोळ्यांतील आसवांची |
| जीव किती हा लहान; | ज्योत ज्योत पाजळावी |
| | |
| तुझ्या शौर्यगाथेपुढे | अशा असंख्य ज्योतींची |
| त्याची केवढीशी शान; | तुझ्यामागुन राखण; |
| | |
| वर घोंघावे बंबारा, | दीनदुबळयांचे असें |
| | |

| पुढे कल्लोळ धुराचे, | तुला एकच औक्षण. |
|---|---|

**Ans**

**A2)** योग्य पर्याय निवडा 2

1)
i. तुझी ............... दौड डोळे भरून पाहावी. (अजयाची / विजयाची / जयाची)
ii. तुझ्या ............... त्याची केवढीशी शान. (शौर्यकथा / शौर्यगाथा / शौर्यगोष्ट)

**Ans**
i. तुझी **विजयाची** दौड डोळे भरून पाहावी.
ii. तुझ्या **शौर्यगाथा** त्याची केवढीशी शान.

2)
i. वर घोंघावे बंबारा पुढे .............. धुराचे. (लोट , कल्लोळ , लाटा)
ii. ............... असे तुला एकच औक्षण. (गरिबांचे / दीनदुबळयांचे / दीनदु:खितांचे)

**Ans**
i. वर घोंघावे बंबारा पुढे **कल्लोळ** धुराचे.
ii. **दीनदुबळयांचे** असे तुला एकच औक्षण.

**A3)** प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा. 2

i. कष्ट -
ii. सामथ्र्य -
iii. जीव -
iv. शौर्य -

**Ans** i. कष्ट - **मेहनत**
ii. सामथ्र्य - **बळ, शक्ती**
iii. जीव - **प्राण**
iv. शौर्य - **पराक्रम**

**A4)** स्वमत 2

'देशसेवा हीच ईश्वर सेवा' असे समजून कार्य करणाऱ्या सैनिकांसाठी तुम्हाला कार्य करावेसे वाटते?

**Ans** देश हाच देव समजून सैनिक देशाची सेवा करीत असतात. त्यांचे हे काम अतुलनीय आहे. 'देश हाच देव' असे समजून देशाच्या रक्षणासाठी प्राण अर्पण करणारे सैनिक अतिशय नि : स्वार्थ भावनेने दिवसरात्र देशाच्या सीमेवर पहारा देत असतात ऊन, थंडी, पावसाची तमा न बाळगतात देशासाठी प्राण अर्पण करायला तयार होतात. अशा वेळेस आम्ही त्यांच्या या गुणांचे कौतुक भेटकार्ड देऊन करू.

**Q.3** **पुढीलपैकी कृती सोडवा : (स्थूलवाचन)** **3**

**1** सूर्यास्ताच्या दर्शनाने मनात निर्माण होणा-या मानवी भावभावना स्पष्ट करा.

**Ans** सूर्यास्ताच्या दर्शना वेळी मनात भीतीचे वातावरण निर्माण होते. सूर्योद्याने प्रकाशित झालेली पृथ्वी आता अंधारात जाणार सगळीकडे होणारा पक्ष्यांचा, प्राण्यांचा व मानवाचा गलगलाट शांत होणार या विचाराने मन अस्वस्थ होते. तेजस्वी सूर्य लालबुंद होऊन ढगांच्या मागे लपायला लागतो मग रात्रीचा खेळ सुरू होतो. हा अंधार सगळ्यांना गिळून टाकेल, नष्ट करेल अशी चिंता मनाला लागून राहते.

**Q.4** **कंसातील सूचनेनुसार वाक्यरुपांतर करा. नकारार्थी / होकारार्थी** **1**

**1** निरंजन गुरूजींचा आवडता विद्यार्थी होता. (नकारार्थी वाक्य करा)

**Ans** निरंजन गुरूजींचा नावडता विद्यार्थी नव्हता.

**Q.5** **कथालेखन(Any One)** **6**

**1** **खालील मुद्द्यावरून कथा लिहा.**

**मुद्देः**
एक व्यापारी - अंगठी  चोरीस जाणे -  नोकरांवर संशय - प्रकरण कोर्टात जाणे - न्यायाधीशाची मुक्ती -  समान उंचीच्या काठया देणे - अंगठी चोराची काठी दोन इंच वाढेल - दुसऱ्या दिवशी सर्व नोकरांच्या काटया बघणे  - एकाची दोन इंच लहान - चोर पकडणे - अंगठी परत मिळणे - तात्पर्य.

**Ans** .

**2** **पुढील शब्दांच्या आधारे कथा लिहा.**
मुलगा, वडील – गाढव – रस्त्यातील माणसे

**Ans** .